दिनांक ०५.०३.२०२६.

**प्रेसनोट**

आरोपी लोकसेवक संतोष बबनराव कढने, वय ४४ वर्ष, पद मुख्याध्यापक (गट–ब), मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख, ता. औंढा ना. जि. हिंगोली , रा. वृंदावन पार्क, लेडी हार्डींग रोड, गजानन महाराज मंदिर शेजारी वाशिम, जि. वाशिम यांनी तक्रारदार यांचेकडे पगारामध्ये वार्षीक ५८,१२०/– रूपये घरभाडे भत्ता रकमेच्या ५० टक्के रक्कम २९,०६०/– रूपये लाचेची मागणी केली. दिनांक २७.०२.२०२६ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोड करून २८,०००/– रूपये ची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्शवली. दिनांक ०५.०३.२०२६ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक संतोष कढने यांनी २८,०००/– रूपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर, ता. जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

पिडीत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, हिंगोली येथे दिनांक २४.०२.२०२६ रोजी तक्रार दिली होती की, तक्रारदार यांना पगारामध्ये वार्षीक ५८,१२०/– रूपये घरभाडे भत्ता मिळाला आहे. आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांना वार्षीक मिळालेल्या घरभाडे भत्ता रकमेच्या ५० टक्के रक्कम २९,०६० रूपये मागणी करून सदर रक्कम दिले नाही तर तक्रारदार हे मुख्यालयात राहत नाहीत म्हणुन शिक्षण अधिकारी माध्यमिक यांना अहवाल पाठवुन पगारामध्ये मिळणारा घरभाडे भत्ता बंद करेन म्हणुन मुख्याध्यापक संतोष बबनराव कढने, मधुमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लाख, ता. औंढा ना. जि. हिंगोली यांनी तक्रारदार यांना मिळालेल्या वार्षीक घरभाडे रक्कमेच्या ५० टक्के रक्कम लाच मागणी करीत आहेत अशी तक्रार प्राप्त झाली.

दिनांक २७.०२.२०२६ रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान मुख्याध्यापक संतोष कढने यांनी तक्रारदार यांना वार्षीक मिळालेल्या एकुण ५८,१२०/– रूपये घरभाडे रक्कमेच्या ५० टक्के पैकी तडजोड करून २८,०००/– रूपयाची मागणी केली आणि सदर लाच रक्कम स्वत: स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक ०५.०३.२०२६ रोजी हिंगोली–नांदेड रोडवरिल खटकाळी बायपास येथील आयान पान सेंटर समोर हिंगोली येथे करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे मुख्याध्यापक कढने तक्रारदार यांच्याकडुन शासकिय पंचासमक्ष लाच रक्कम २८,०००/– रूपये स्वत: स्विकारली असता त्यांना लाच रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर गुरनं १३८/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. श्री अशोक कदम, अपर पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो नांदेड व श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली श्री राजेश मलपिलु, पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, पोह राजाराम फुपाटे, भगवान मंडलिक पो.शि. पुंडगे, वाघ, चापोह शेख अकबर सर्व अँन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अँन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड,
मोबा. क्रमांक ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९.
श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६–२२३०५५.
व्हॉटसअॅप क्रमांक :– ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

( राजेश मलपिलु )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.